दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २५१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● सोमवार दि.६ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# द्रोणागिरी किल्ल्याच्या पायथ्याजवळ सापडली पुरातन तोफ

## उरणच्या इतिहासाला उजाळा मिळण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : ऐतिहासिक द्रोणागिरी किल्ल्याच्या पायथ्याशी खोदकाम करताना एक पुरातन तोफ सापडली आहे. इतिहास प्रेमी आणि दुर्ग प्रेमींच्या सहाय्याने ती वर काढण्यात आली असून त्या तोफेची पुजा करून ती व्यवस्थित ठेवण्यात आली आहे. उरण जवळच्या द्रोणागिरी किल्ल्याला ऐतिहासिक महत्व आहे. किल्ल्याच्या परिसरात अनेक ऐतिहासिक खाणाखूणा आणि वस्तू आढळून येतात.

द्रोणागिरी किल्ल्याची सध्या पडझड झाली असून अशा प्रकारच्या अनेक ऐतिहासिक वस्तू जमिनी खाली गाडल्या गेल्या आहेत. सातवहानांच्या एका शिलालेखात उरण जवळील मोर गावाचा उल्लेख आहे.सातव्या शतकाच्या प्रारंभी पुलकेशी चालुक्याने मौर्यांची घारापूरी ही राजधानी काबीज केल्याचा उल्लेख येथील शिलालेखात आहे. घारापूरी या राजधानी पासून जवळ असणार्या उरण बंदराचे रक्षण करण्यासाठी करंजा बेटावरील द्रोणागिरी डोंगरावर किल्ला बांधला असण्याची शक्यता आहे.



द्रोणागिरी किल्ला देवगिरीच्या यादवांच्या ताब्यात होता. इ.स.१५३० मध्येपोर्तुगीजांनी किल्ल्याची डागडुजी केली. १५३५ मध्ये अंतोनो- दो- पोर्तो या पाद्रीने नोसा-सेन्होरे, एन.एस. द पेन्हा व सॅम फ्रान्सिस्को ही चर्चेस बांधली. १६ व्या शतकात काही काळ हा किल्ला आदिलशहाकडे होता.त्यानंतर हा किल्ला इंग्रजांकडे गेला.मुंबई बेटाच्या संरक्षणाच्या दृष्टीने घारापूरी किल्ला, उरण गाव व उरण जवळील करंजा बेटावर असलेला द्रोणागिरी किल्ला महत्वाचा होता.

१० मार्च १७३९ ला मानाजी आंग्रे यांनी उरणचा कोट व द्रोणागिरी किल्ला इंग्रजांकडून जिंकून घेतला असल्याच्या इतिहासात नोंद आहे.द्रोणागिरी डोंगराच्या पायथ्याशी डाऊरनगर येथे खोदकाम करतानाही पुरातन तोफ सापडल्याने उरणच्या इतिहासाला उजाळा मिळण्याची शक्यता आहे. ही तोफ यादवांच्या काळातील आहे का पोर्तुगिज काळातील आहे याची माहिती मिळाली नसली तरी त्यावर संशोधन करणे गरजेचे आहे असे मत इतिहास प्रेमींनी व्यक्त केले.

# राज्यात ओमिक्रॉनचा फैलाव; पुण्यासह पिंपरी चिंचवडमध्येही आढळले रुग्ण

**दै.रायगड नगरी । पुणे**

कल्याण डोंबिविलीत शनिवारी ओमिक्रॉन या करोनाच्या नव्या व्हेरिएंटचा एक रुग्ण आढळल्याने या विषाणूचा राज्यात शिरकाव झाल्याचं स्पष्ट झालं होतं. त्यानंतर आता पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्येही ओमिक्रॉनबाधित रुग्ण आढळले आहेत. पुणे शहरात एक तर पिंपरी चिंचवडमध्ये सहा असे एकूण सात रुग्ण पुणे जिल्ह्यात आढळले आहेत. त्यामुळे ओमिक्रॉनच्या रुग्णांची संख्या राज्यात आठपर्यंत पोहोचली आहे.


पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये आढळलेल्या ओमिक्रॉन रुग्णांची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. राज्याच्या आरोग्य विभागाने या संदर्भात सायंकाळी माहिती दिली. पुणे शहरातील ओमायक्रॉनबाधित रुग्ण नेहमीच्या सर्वेक्षणात आढळला असून हा रुग्ण १८ ते २५ नोव्हेंबर काळात फिनलंड येथे गेला होता. २९ तारखेला थोडासा ताप आला म्हणून त्याची चाचणी केली असता त्याला करोनाची बाधा झाल्याचं स्पष्ट झालं. नायजेरिया देशातील लेगॉस शहरातून भावाला भेटण्यासाठी आलेली ४४ वर्षांची महिला, तिच्यासोबत आलेल्या दोन मुली आणि पिंपरी चिंचवड शहरात राहणारा तिचा भाऊ आणि त्याच्या दोन्ही मुली अशा एकूण सहा जणांच्या प्रयोगशाळा नमुन्यांमध्ये 'ओमिक्रॉन' विषाणू सापडल्याचा अहवाल पुण्याच्या राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेने (एनआयव्ही) रविवारी संध्याकाळी दिला आहे. त्यामुळे राज्यातील ओमिक्रॉनच्या रुग्णांची एकूण संख्या आठपर्यंत पोहोचली आहे.

दरम्यान, ओमिक्रॉन या करोनाचा नवा व्हेरिएंट आधीच्या इतर व्हेरिएंटपेक्षा अधिक घातक असल्याचं तज्ज्ञांकडून सांगण्यात आलं आहे. त्यातच पुणे जिल्ह्यात आता ओमिक्रॉनबाधित रुग्ण आढळल्याने प्रशासनाला अधिक खबरदारी घ्यावी लागणार आहे.

# शिवभक्तांच्या भावनेचा मान राखत राष्ट्रपती दुर्गराज किल्ले रायगडावर 'रोपवे'ने येणार

**दै.रायगड नगरी । रवि शिंदे**

**महाड** : भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद आज सोमवार दिनांक ६ डिसेंबर रोजी दुर्गराज किल्ले रायगडावर महाराष्ट्राचे आराध्य दैवत राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन करण्याकरिता गडावर येणार आहेत. ते शिव भक्ताचा मान राखत हेलिकॉप्टरने नाही तर रायगड रोपवेनी येणार असल्याचे ट्विट संभाजीराजे राजे छत्रपती यांनी केल आहे. यामुळे तमाम शिवभक्तांमध्ये आंनदाचे वातावरण पसरल आहे.



संभाजीराजे छत्रपती यांनी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना दुर्गराज किल्ले रायगडावर येवून छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवाद करण्याकरिता प्रत्यक्ष भेटून विनंती केली होती. त्याला राष्ट्रपती तात्काळ होकार दर्शविला होता आणि त्याबाबत शासकीय दौराही निश्चित करण्यात आला. सुरक्षेच्या कारणास्तव सुरुवातीला राष्ट्रपती हेलिकॉप्टरद्वारे किल्ले रायगडावरील होळीचा माळ येथे उतरणार होते. मात्र त्याला स्थानिक शिवप्रेमी संघटना शिवप्रेमी आणि आमदार भरत गोगावले यांनी तिव्र विरोध दर्शविला होता.

सन १९८० छत्रपती शिवाजी महाराज यांची ३०० वी पुण्यतिथी निमित्त किल्ले रायगडावर भारताच्या तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवाद करण्या करिता दुर्गराज किल्ले रायगडावर लष्कराच्या हेलिकॉप्टर आणि त्यातुन जिप द्वारे गडावर आल्या होत्या. त्यानंतर पुन्हा भारताचे राष्ट्रपती ग्यानी झैलसिंग ही हॅलिकॉप्टर द्वारे गडावर .../२

## संक्षिप्त...

### लोकशाहीत प्रत्येकाला मत व्यक्त करण्याचा अधिकार, व्यक्तिगत हल्ला चुकीचा : शरद पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नाशिक येथे सुरु असलेल्या ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी दाखल झालेले ज्येष्ठ पत्रकार तथा लोकसत्ताचे मुख्य संपादक गिरीश कुबेर यांना छत्रपती संभाजी ब्रिगेडच्या काही कर्यकर्त्यांनी काळे फासल्याने खळबळ उडाली. यानंतर आता विविध स्तरातून निषेध व्यक्त केला जात असून, संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसत आहे. यातच राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांनी या घटनेवर बोलताना लोकशाहीत प्रत्येकाला मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे, असे म्हटले आहे.

अशी काही घटना घडेल याची कुणकुण होती. संभाजी ब्रिगेडचा त्यांच्याशी काही तरी वाद आहे. पण संभाजी ब्रिगेड त्यांना निवेदन देऊन आपले म्हणणे मांडतील असे वाटत होते. पुण्यातून दोन जण मोटारसायकलवरून आले. त्यांनी काळी पावडर कुबेर यांच्या अंगावर फेकली. व्यासपीठाजवळील प्रवेशद्वाराजवळ वाहन स्लो झाले आणि या दोघांनी त्यांच्यावर काळी पावडर फेकली. पंकज भुजबळ यांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला. पण तोपर्यंत हे लोक काळी पावडर फेकून पळून गेले, असा घटनाक्रम छगन भुजबळ यांनी सांगितला. लोकशाहीत प्रत्येकाला मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे. तसेच प्रत्येकाला विरोध करण्याचाही अधिकार आहे, पण व्यक्तिगत हल्ला चुकीचा आहे. त्या मतांचा विरोध करणारे दुसरेही घटक असू शकतात. देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य आपण स्वीकारले आहे. आपल्या मनाविरुद्ध एखाद्या लेखकाने एखादी गोष्ट लिहिली तर त्या लेखकावर व्यक्तिगत हल्ला करणं अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधी आहे. आम्ही त्याचा पुरस्कार कधीही करणार नाही. ही घटना निंदनीय आहे व महाराष्ट्राला शोभा देणारी नाही. विशेषतः तात्यासाहेब शिरवाडकरांच्या नावाने ज्या परिसरामध्ये साहित्य संमेलनाचा सोहळा इतक्या उत्साहाने आणि उत्तम रीतीने सुरू आहे, अशा परिसराजवळ हा प्रकार घडला.

# जमिनीच्या वादातून सुगवे गावात दोन गटात वाद ; १२ जणांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सूगवे गावातील घराच्या कुंपणाबद्दल खोदकाम करण्यावरून जागेचा प्रश्न समोर आला. त्यात दोन गटात वाद झाला आणि त्यात अंगावर धावून जाण्यापर्यंत आणि मारहाण करण्यावर हा प्रकार गेला. त्यानंतर कर्जत पोलीस ठाण्यात दोन्ही गटांकडून तक्रारी देण्यात आल्या आणि त्यामुळे कर्जत पोलिसांनी दोन परस्पर विरोधव गुन्हे दाखल केले असून त्या गुन्हेमध्ये दोन गटातील १२ जणांवर गुन्हे दाखल झाले आहेत.

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत मौजे सुगवे येथे घराचे समोरील कंम्पाउन्डचे खोदकामाबाबत वाद आहे. मौजे सुगवे येथे फिर्यादीचे घराचे अंगणासमोर याठिकाणी यांतील फिर्यादी हे सुगवे गावचे नाक्यावरुन घरी गेले असताना तेव्हा घराचे जोत्याला लागुन वॉल कंम्पांउन्डचे काम करत होते तेव्हा फिर्यादी यांचा भाउ हे आरोपी एक याने फिर्यादी यास तुमच्या बाँन्ड्रीप्रमाणे काम करुन घ्या असे समजावुन सांगत असताना तेव्हा आरोपी एक याने फिर्यादीचा भाउ यांना सांगितले कि, आम्ही आमच्या जागेत काम करीत आहोत असे बोलुन आरोपी एक याने फिर्यादीचा भाऊ यांना हाताबुक्यांनी मारहाण व शिवीगाळ करीत असताना त्यांची भांडणे सोडविणेसाठी फिर्यादी व त्यांची पत्नी व आई व सुगवे गावचे सरपंच असे गेले असता तेथे आरोपी एक ते पाच यांनी बेकायदेशीर जमाव जमवुन त्यांनी फिर्यादी व फिर्यादीची पत्नी व साक्षीदार यांना .../२

# चिंचवण गावातील रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील चिंचवण गावातील अंतर्गत रस्त्याचे लोकार्पण रविवारी आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पनवेल नगरीचे मा.नगराध्यक्ष जे.एम म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.



चिंचवण गावातील हा रस्ता खराब झाल्याने त्याची डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी चिंचवण ग्रामस्थ करत होते. त्यानुसार गावातील शेकापचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी मा. आमदार विवेकानंद पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला व या रस्त्यासाठी रायगड जिल्हा परिषद नियोजन समितीच्या माध्यमातून आमदार बाळाराम पाटील व पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती व विद्यमान सदस्य काशिनाथ पाटील यांनी निधी उपलब्ध करून दिला.

लोकार्पण कार्यक्रमासाठी आमदार बाळाराम पाटील, मा.नगराध्यक्ष जे.एम म्हात्रे यांच्यासह पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा.सभापती व संचालक रामशेठ भोईर, शेकाप जेष्ठ नेते महादेव पाटील, मा.उपसरपंच सचिन खुटले, विद्यमान सरपंच पद्माकर कातकरी, विद्यमान उपसरपंच वसंत पाटील, पुरोगामी युवक संघटना पनवेल तालुका उपाध्यक्ष अमित भोईर, उद्योगपती श्याम ठोंबरे, समाजसेवक आत्माराम घरत, मा.ग्रामपंचायत सदस्य जगदीश पाटील, काशिनाथ भोईर, काशिनाथ खुटले, सदानंद खुटले, पोलीस पाटील दिलीप खुटले, शिवराम खंडाकले, संजय खंडाकले, महेश भोईर, निलेश भोईर, अनंत पोपेटा, संतोष घरत, .../२

# केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी जेएनपीटी बंदराची प्रगती व पायाभूत सुविधांचा घेतला आढावा



**दै.रायगड नगरी । उरण**

केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग आणि पर्यटन राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी भारताचे अग्रणी कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट अर्थात जेएनपीटी बंदराचा दौरा केला. मंत्री महोदयांनी आपल्या भेटीदरम्यान बंदराच्या कामकाजाचे बारकाईने निरीक्षण केले आणि जागतिक सागरी व आयात-निर्यात समुदायास पूरविल्या जाणाऱ्या बंदरातील जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आणि तांत्रिक प्रगतीबद्दल बंदर प्रशासनाची प्रशंसा केली.

जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, आणि उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ, यांनी माननीय केंद्रीय राज्यमंत्र्यांचे बंदरात स्वागत केले. बंदरात तैनात असलेल्या केंद्रीय औद्योगीक सुरक्षा दलाच्या जवानांनी राज्यमंत्र्यांना 'गार्ड ऑफ ऑनर' दिला. आपल्या भेटी दरम्यान केंद्रीय राज्यमंत्री नाईक यांनी जेएनपीटीतील विविध टर्मिनल्सना भेट दिली व बंदराच्या भागधारकांशी सुद्धा संवाद साधला.

बंदराच्या कार्यक्षमतेमध्ये आणखी वाढ करण्यासाठी हाती घेतलेल्या अनेक तंत्रज्ञान-सक्षम 'स्मार्ट पोर्ट उपक्रमां' विषयी माहिती घेतली. याव्यतिरिक्त, मंत्री श्री नाईक यांनी कार्यक्षम आणि कुशल क्रेन ऑपरेटरना प्रशिक्षण देण्यासाठी वापरले जाणारे आरएमक्यूसी क्रेन सिम्युलेटर चालविण्याचा देखील अनुभव घेतला. हे सिम्युलेटर बंदराच्या कामकाजाचा अविभाज्य व महत्वपूर्ण हिस्सा आहेत.दौ-याच्या सुरवातीला झालेल्या बैठकीदरम्यान जेएनपीटीच्या अधिकाऱ्यांनी मंत्र्यांना बंदराच्या भविष्यातील विस्तार योजनांची माहिती दिली.

तसेच जेएनपीटीने नुकतीच सुरू केलेली 'ड्वार्फ कंटेनर ट्रेन' सेवा, कोस्टल बर्थ, ग्रीन पोर्ट इनिशिएटिव्ह, मल्टी-प्रॉडक्ट एसईझेड, सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा, ड्राय पोर्ट्स, डिजिटायझेशन इनिशिएटिव्ह यासह व्यवसायात सुलभता वाढवण्यासाठी हाती घेतलेले विविध उपक्रम, वाढवण बंदराची प्रगती व जेएनपीटी बंदर आधारित इतर मल्टीमॉडल पायाभूत सुविधा प्रकल्पांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

# महामानव विचार अभियानाद्वारे बार्टी महापरिनिर्वाण दिनी अभिवादन करणार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी ६ डिसेंबर २०२१ रोजी संपूर्ण राज्यात महामानव विचार अभियान राबविणार असून राज्यातील सर्व समतादुत या अभियानात आपापल्या कार्यक्षेत्रात नियमांचे पालन करून महामानवांच्या विचारांचा व कार्याचा तसेच बार्टी व सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजना व उपक्रमाचा प्रसार व प्रचार करतील.



ओमिक्रॉन या नविन वेरिएंटमुळे शासनामार्फत प्रतिबंधात्मक सुचनांचे पालन करुन बार्टी संस्थेच्यावतीने ऑनलाइन पद्धतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत २१ व्या शतकातील भारतीय सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक चळवळ .. या विषयावर संविधानाचे अभ्यासक ज्येष्ठ विचारवंत प्रोफेसर पी. आर. सोनवणे यांचे ऑनलाइन पद्धतीने व्याख्यान आयोजित केले असून अध्यक्षस्थानी बार्टीचे महासंचालक श्री धम्मज्योती गजभिये, हे आहेत.


बार्टी संस्थेच्या वतीने बार्टी मुख्यालय, पुणे तसेच चैत्यभूमी, दादर, मुंबई येथे महामानवास विनम्र अभिवादन करण्यात येणार असून महामानव विचार अभियानात सर्व अधिकारी व कर्मचारी समतादुत व नागरिकांनी कोविड-१९ च्या नियमाचे पालन करून ऑनलाइन पद्धतीने सहभागी व्हावे असे आवाहन बार्टीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# कर्जत - खोपोली मार्ग ठरतोय 'मौत का कुआ'!

## खोपोली-कर्जत मार्ग प्रवासासाठी असुरक्षित ; रस्त्यावरील दिशादर्शक फलकाची हडताळ

**दै.रायगड नगरी । खोपोली**

कर्जत- खोपोली रस्त्यावर आज सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास पुन्हा एक कार रस्त्यावरून पलटी होता-होता वाचली. अपूर्ण अवस्थेतील रस्ता, दिशादर्शक फलकांची वाणवा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे हा मार्ग 'मौत का कुव्वा' करू पाहत आहे. ह्या मार्गावर प्रवास करणे जिकरीचे बनले आहे. ह्या मार्गाला कोणी वाली आहे का नाही? असा प्रश्न निर्माण झालेला असतानाच एमएसआरडीसीचे अधिकारी व ठेकेदार टोल नाका बनविण्यात मग्न झाल्याचे चित्र दिसून येत आहे.



कर्जत- खोपोली रस्त्याचे रुंदीकरण व सिमेंट काँक्रिटीकरणचे काम अनेक ठिकाणे पूर्ण झाले तर काही ठिकाणी शेतकऱ्यांसोबत वादामुळे व त्यांना योग्य मोबदला न मिळाल्याने अर्धवट अवस्थेत पडला आहे. हाळ फाटा ते अंजरून गावाच्या सिमेपर्यंत रस्त्यांचे काम हे अर्धवट असून फक्त एका लेनचे झाले आहे. जुन्या डांबरी रस्त्यांपासून हा सिमेंट काँक्रीटचा रस्ता तीन ते चार फूट उंच बनविण्यात आला आहे. रस्ता उंच झाल्याने व अर्धवट असल्याने तसेच रस्त्याच्या साईट पट्टीवर माती न टाकल्याने भलेमोठे खड्डे पडले आहेत. या मार्गांवर एकाच .../२

# शासकीय सेवावृद्धीचे दुखणे

शस्त्रक्रिया पुढे ढकलणे हा जीव वाचविण्याचा पर्याय ठरू शकतो काय? राज्य सरकारने सध्या या प्रश्नावर गंभीर चिंतन करण्याची गरज आहे. वेळेवर निदान आणि उपलब्ध साधनांसह तत्पर कारवाई या वैद्यकीय पर्यायानेच आरोग्य संवर्धन शक्य आहे. शस्त्रक्रियेला दिलेली बगल अंगलट येऊ शकते. तसे झाल्याने कालबद्ध निर्णयांमुळे पडणारा आर्थिक बोजा सोसण्यापेक्षा पात्र उमेदवारांची संधी डावलल्याची टीका राज्य सरकारवर होत आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि राज्य कामगार विमा योजनेत येणाऱ्या रुग्णालयांतील वैद्यकीय तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय पूर्वी ५८ होते. फडणवीस सरकारने २०१८ मध्ये ते ६० केले. विद्यमान ठाकरे सरकारने ही सेवावृद्धी ६२ पर्यंत नेऊन ठेवली. या सततच्या सेवावृद्धीला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. उच्च न्यायालयाने ही सेवावृद्धी अयोग्य ठरवली. ताज्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयानेही सेवावृद्धीला आळा घातल्याने सरकार तोंडघशी पडले आहे. हा धक्का वैद्यकीय शिक्षण विभागालाही बसला असून नव्या नोकऱ्यांचा दबाव वाढत असताना जुन्याचे दुखणे लांबविणे कितपत योग्य आहे, अशा थेट प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. करोनाकाळाने अर्थव्यवस्थेचे कवच उद्धस्त केले आहे. मंदीचा काळ वाढत चालल्याने जुन्या निवृत्ती रकमांचे 'शिवधनुष्य' पेलायचे की नाही, याबाबत राज्य सरकार संभ्रमावस्थेत आहे. त्यातूनच आरोग्य विभागातील निवृत्तीचे वय ६२ करण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. परीक्षांचा काळ प्रदीर्घ करीत नेणे हे संकटांनी उभे केलेले सर्वांत मोठे आव्हान असते. या कालावधीत संयम आणि समन्वयात गफलत झाली तर फटकाही दीर्घ असतो. राज्यातही हाच पायंडा लागू करायचा ठरविला तर संभाव्य बेरोजगारीच्या अनुशेषाला हातभार लावण्याजोगी स्थिती निर्माण होईल. तो धोका तुलनेने अधिक मोठा असेल. त्याचा विचार आताच व्हायला हवा. राज्याच्या गृह, अर्थ, कृषी, सार्वजनिक आरोग्य, पशुसंवर्धन, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा, महसूल आदी विभागांमधील अंदाजे अडीच लाख कर्मचारी सेवानिवृत्त होणार आहेत. त्यातून सरकारी तिजोरीला मोठा आर्थिक भार सोसावा लागेल. सेवानिवृत्ती वयाच्या वाढीस अर्थ विभागाने आधीच अनुकूलता दाखविली होती. राज्याच्या या सकारात्मक संकेतांनी वादात तेल ओतले गेले. युवकांची संख्या सर्वाधिक असलेल्या आपल्या देशापुढे बेरोजगारीचे संकट मोठे आहे. अशा स्थितीत सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवावृद्धीने अडचणी तेवढ्या वाढतील. हाच पायंडा अन्यत्र राबवायचा ठरविल्यास ते अवघड जागेचे दुखणे ठरेल. करोनाच्या संकटामुळे राज्याची आर्थिक स्थिती ढासळली आहे. नव्या पदांची भरती पुढील वर्षभर तरी दुरापास्त दिसते आहे. मुख्य म्हणजे वरिष्ठ पदांवरील निवृत्त्या थोपविल्याने अनेकांच्या संभाव्य पदोन्नत्या अडल्या आहेत. मागील काही वर्षांत अनेक अधिकाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने सरकारच्या मूळ संकल्पनेलाच हरताळ फासला गेला. सक्षम अधिकाऱ्यांच्या सेवेचा लाभ मिळाला एवढाच हेतू निवृत्ती वय लांबविण्यामागे असता, तर हा निकष सर्व सरकारी विभागांमध्ये का लागू केला नाही, हा प्रश्न उपस्थित होतो. करोनाच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी सक्षम आरोग्यसेवक असावेत म्हणून वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवावाढ देण्याचा निर्णय घेतल्याचे मध्यंतरी राज्याच्या आरोग्यमंत्र्यांनी म्हटले होते. सरकारी रुग्णालये व सार्वजनिक आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांचा तुटवडा आहे, या सबबीवर मधल्या काळात जिल्हा आरोग्य अधिकारी, शासकीय शल्यविशारद आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निवृत्तीचे वय ५८वरून ६० वर्षे करण्याचा राज्य सरकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने अवैध ठरविला. सेवावृद्धीबाबतचे २०१५चे शासननिर्णय उच्च न्यायालयाने गतवर्षी रद्द ठरविले. हा निर्णय देताना न्यायालयाने केलेल्या सूचना महत्त्वाच्या होत्या. करोनाच्या संकटामुळे शासन निर्णयाच्या लाभार्थ्यांच्या सेवांना तात्काळ धक्का लावू नये, मात्र यापुढे अशा अधिकाऱ्यांना सेवा मुदतवाढ देऊ नये, असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने राज्याला दिले होते. सार्वजनिक आरोग्य विभाग व सरकारी रुग्णालयांतील रिक्त पदे भरण्यासाठी २०१५पासून गांभीर्याने प्रयत्न न केल्याबद्दल न्यायालयाने सरकारचे कान टोचले होते. मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त ठेवण्याची चूक सरकारने केली असताना सेवावृद्धी अयोग्य ठरते, असे मत या खटल्यात न्यायालयाने नोंदविले होते. सर्वोच्च न्यायालयानेही तोच निर्णय कायम ठेवल्याने सरकारच असहाय झाले आहे. आजवर पदोन्नतीपासून वंचित ठरलेल्या अधिकाऱ्यांना न्याय मिळाला आहे. शासकीय निर्णयानुसार ज्यांना सेवावृद्धीचा लाभ झाला, त्यांचे आता काय करायचे या प्रश्नाची शस्त्रक्रिया सरकारला आता करावी लागेल. मुळात सरकार अशी कुठवर सेवा लांबवित नेणार आहे? सेवावृद्धीतून संकट लांबविण्याच्या प्रक्रियेला तेवढे बळ मिळेल. पात्र उमेदवारांच्या कालबद्ध पदोन्नतीकडे शासन निर्णयाच्या नावाखाली दुर्लक्ष करता येणार नाही, हा धडा सेवावृद्धी प्रकरणाने दिला आहे.

# माथेरान नगरपरिषदेच्या निवडणुकीत घोडेबाजाराला येणार उधाण? पक्षांतर्गत मतभेद चव्हाट्यावर येण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीला एक ते दीड महिन्यांचा कालावधी शिल्लक राहिलेला असल्याने सत्ता स्थापन करण्यासाठी राष्ट्रीय काँग्रेस, शिवसेना, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस या प्रमुख पक्षांनी आतापासूनच कंबर कसली आहे.त्यातच आगामी निवडणूक ही खऱ्या अर्थाने दुहेरी होण्याची शक्यता होती परंतु इथल्या राजकीय क्षेत्रात सत्ताधारी गट आणि विरोधी पक्षांमध्ये २०१६ ते २०२१ पर्यंत ज्या ज्या घडामोडी होत राहिल्या आहेत यामध्ये प्रामुख्याने पाच वर्षांच्या कार्यकाळात सत्ताधारी गटाच्या विकास कामांना होत असलेले अप्रत्यक्षपणे सहकार्य आणि विरोध ह्या दोन्ही भूमिका नागरिकांनी अगदी जवळून पाहिल्या आहेत त्यामुळे आगामी २०२२ मधील होणाऱ्या निवडणुकीत स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवून जरी काही पक्षांनी रणशिंग फुंकलेले आहेच पण त्यांनी घेतलेल्या या स्वबळाच्या निर्णयावर ते स्वतः ठाम राहतील की नाही हे सुध्दा एक कोडेच आहे.



स्वबळाची भाषा करून काही पक्ष आतून साटेलोटे करुनच स्वतःच्या पक्षाच्या चिन्हावर निवडणुकीला सामोरे जाणार यात तिळमात्र शंकाच नाही. काही पक्षांत तर कार्यकर्ते सुध्दा कमी प्रमाणात होत गेल्याने मैत्रीपूर्ण राजकारण या ठिकाणी पहावयास मिळणार आहे. काहींची तर यावेळी राजकीय संन्यास घेण्याची शक्यता निर्माण झाली होती परंतु त्यांनाही यावेळी केवळ आधारासाठी अन प्रचार रॅली मध्ये संख्याबळ अधिक दिसावे यासाठी पुनर्जीवित करण्यात आल्याने तिरंगी लढत होण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.ज्यांच्या सोबत कार्यकर्ते देखील नाहीत त्यांना अग्रस्थान देण्यासाठी काही पक्ष पुढाकार घेताना दिसुन येत आहेत. प्रतिष्ठेला तडा जाऊ नये यासाठी पक्षांतर्गत हेवेदावे यावेळी चव्हाट्यावर येण्याची चिन्हे स्पष्टपणे नागरिकांना पहावयास मिळणार आहेत. त्यामुळे सत्तेच्या समीप असताना सुध्दा केवळ स्वतःच्या इगोमुळे पक्षासोबत राहून आपल्याच उमेदवारांना पराभूत करण्याची (पाडापाडीच्या खेळीच्या डावाची) अनुभूती मतदार उघड्या डोळ्यांनी पाहणार आहेत. सध्यातरी इथे राष्ट्रीय काँग्रेस, शिव–सेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे सर्वकँष दृष्टीने सक्षम आहेत. त्यामुळे सत्ता स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर घोडेबाजाराला उधाण येणार असून ऐन मंदीच्या काळात मात्र मतदारांची दिवाळी साजरी होणार आहे. माथेरानमधील आजवरच्या निवडणूक काळात ज्या ज्या सत्ताधाऱ्यांनी आपापल्या परीने जरी मोठ्या प्रमाणात विकास कामे तडीस नेली असली तरीसुद्धा ज्याचे दाम मोठे त्यालाच सभागृहात पाठविण्याची जबाबदारी इथले मतदार डोळेझाक करून पार पाडत असतात. त्याला कारणेही तशीच आहेत.तर ज्यांनी मागील पाच वर्षात मतदारांशी संपर्क सुध्दा साधलेला नाही केवळ निवडणुका जवळ आल्या आहेत म्हणून होत असलेली धावपळ अशांना काही प्रमाणात यावेळी ही निवडणूक काहीअंशी त्रासदायक ठरणार आहे तर काही पक्षाच्या मंडळींनी विरोधी पक्षांच्या कार्यकर्त्यांना सक्षम बनविण्यासाठी पुढाकार घेतला होता त्यांनाही कदाचित थोडाफार फरक मतदानाच्या माध्यमातून अनुभवयास लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे लवकरच आरक्षण जाहीर होऊन कधी एकदाचे मतदान करून आपल्या पारड्यात किती आर्थिक लाभ होऊ शकतो याकडे सुध्दा काही मतदारांचे लक्ष लागून राहिले आहे.

# रोहा प्रेस क्लबच्या रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोह्यातील दानशूर व्यक्तिमत्त्व, प्रेस फोटोग्राफर कै जनार्दन शेडगे यांच्या स्मरणार्थ रोहा प्रेस क्लब व कै जनार्दन शेडगे मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात १३१ पिशव्या रक्त जमा करण्यात आले. कै जनार्दन शेडगे यांनी त्यांच्या आयुष्यात अनेक वेळा रक्तदान करून रूग्णांचे प्राण वाचवले होते. ती भावना कायम ठेवण्याच्या उद्देशाने रोहा प्रेस क्लबच्या वतीने गेली १८ वर्षं रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात आहे.

शिबिराच्या प्रारंभी कै जनार्दन शेडगे यांना मंडळाचे अध्यक्ष अरूण करंबे, दिलीप वडके, राजेंद्र जाधव यांच्यासह उपस्थितांनी श्रद्धांजली वाहिली.

यावेळी माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, रोहा तालुका सिटीझंस फोरमचे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक आप्पा देशमुख, अ‍ॅड मनोजकुमार शिंदे, महेश सरदार, संदीप सरफळे, उस्मानभाई रोहेकर, आप्पा शेडगे, राजेश काफरे, आदिं मान्यवर उपस्थित होते. प्रांताधिकारी डॉ. यशवंतराव माने, पोलीस निरीक्षक संजय पाटील, सहा. पो. नि. ठाकरे, विजयराव मोरे, विनोदभाऊ पाशीलकर, अनंतराव देशमुख, अमित घाग, शैलेश रावकर आदींसह औद्योगिक वसाहतीतील विविध कारखान्यांचे व्यवस्थापक, रोह्यातली प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी व समाजसेवी संस्थानी सदिच्छा भेट दिली.

शिबिरासाठी रायगड प्रेस क्लब उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, रोहा प्रेस क्लब अध्यक्ष शशिकांत मोरे, माजी अध्यक्ष उदय मोरे, अल्ताफ चोरडेकर, सुहास खरीवले, नरेश कुशवाह, श्याम लोखंडे, रविंद्र कान्हेकर, शरद जाधव, समीधा अष्टीवकर, सचिन शेडगे, विश्वजित लुमण, दिनेश जाधव, सिद्धेश ममाले, सचिन साळुंखे, उद्धव आव्हाड, अमित कासट आदींसह प्रेस क्लब व शेडगे मित्रमंडळाने विशेष परिश्रम घेतले. शिबिराच्या आयोजनासाठी शासकीय रक्तपेढीचे डॉ दीपक गोसावी व त्यांच्या टीमने सहकार्य केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शिवभक्तांच्या भावनेचा मान राखत राष्ट्रपती दुर्गराज किल्ले रायगडावर 'रोपवे'ने येणार

आले होते

मात्र गडावरील होळीच्या माळावर असणाऱ्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर प्रचंड धुळीचे कण उडाल्याने शिवप्रेमिच्या भावना दुखावल्या होत्या. त्यानंतर मात्र कायम रायगडावर हेलिकॉप्टर उतरवण्यावर शिवप्रेमिचा कायम विरोध राहिला मग ती व्यक्ती कुणी असो. शिवप्रेमिंच्या भावनांचा विचार करत आताचे भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी रोपवेणी रायगडावर येण्याचे समजताच संभाजी राजे छत्रपती आणि हजारो शिवप्रेमिंमध्ये आनंदाच वातावरण तर पसरले आहे. त्याबरोबर राष्ट्रपतीच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रति प्रेमभावनाही दिसून आली आहे.

दरम्यान, राष्ट्रपतींच्या सुरक्षेसाठी किल्ले रायगड आणि परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. राष्ट्रपतींना एसआयटीचे सुरक्षा कवच आहे. या खेरीज महाराष्ट्र पोलिसांचा गडाला वेढा पडला आहे. आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास रायगड आणि पाचाड येथे व्हेंटीलेटरसह आयसीयू युनिट सज्ज करण्यात आले आहे. महाड येथील एका खाजगी रुग्णालयातील आयसीयू युनिटही सज्ज ठेवण्यात आले आहे.

राष्ट्रपती लष्कराच्या हेलिकॉप्टरने येणार आहेत. गडावर ते राजदरबार होळीचा माळ आणि समाधीस्थळी जावून छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करतील. त्यांच्यासाठी गडावर गोल्फ कारची व्यवस्था करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे त्यांच्यासमवेत असतील.

## जमिनीच्या वादातून सुगवे गावात दोन गटात वाद ; १२ जणांवर गुन्हा दाखल

हाताबुक्यांनी मारहाण करुन फिर्यादीची आई हीस खाली पाडुन हाताबुक्याने मारहाण करुन आरोपी एक ते पाच यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना आम्ही याच ठिकाणी वॉल कंपाउंडच्या खोदकाम करणार तुम्ही मध्ये आलात तर तुम्हाला बघुन घेईल अशी धमकी आणि शिवीगाळ केली आहे.

तर दुसऱ्या घटनेत मौजे सुगवे येथे फिर्यादीचे घराचे अंगणासमोर याठिकाणी यांतील फिर्यादी रा.सुगवे ता.कर्जत याचे पती आणि कामगार साक्षीदार हे त्याचे राहते घरासमोर वॉल कंम्पाउन्डचे खोदकाम करीत असताना यांतील आरोपी एक आणि दोन हे दोघे तेथे जावुन कंम्पाउन्डचे खोदकाम करु नका असे सांगितले असता तेव्हा फिर्यादी यांचे पती त्यांना सांगितले की, आम्ही आमचे जागेत वॉल कंम्पाउन्डचे खोदकाम करीत आहेत तेव्हा आरोपी एक ते सहा यांना त्या गोष्टीचा राग आल्याने त्यांनी बेकायदकशीर जमाव जमवुन आरोपी एक ते तीन यांनी फियार्दी व साक्षीदार यांना तुम्हाला खुप माज आला आहे असे बोलुन आरोपी तीन याने यांने फिर्यादीचे पतीच्या तोंडावर उजव्या साईटला फाईट मारुन आरोपी एक याने फिर्यादीच्या पतीचा पाय पकडुन खाली पाडुन हाताबुक्यांने मारहाण करत असताना तेव्हा फिर्यादी तसेच त्याचा मुलगा हे भांडणे सोडविण्यासाठी आले असता त्यांना देखील आरोपी एक ते तीन यांनी हाताबुक्यांनी मारहाण केली तसेच आरोपी चार ते सह यांनी फिर्यादीचे केस पकडुन खाली पाडुन हाताबुक्याने मारहाण केली त्यामध्ये फिर्यादीचे उजव्या हाताच्या कोप–याला मार लागुन फॅक्चर होवुन दुखापत करुन आरोपी एक ते सहा यांनी फिर्यादी व साक्षीदार यांनी आम्ही तुम्हाला वॉल कंम्पाउन्डचे खोदकाम करु देणार नाही तुम्हाला आम्ही बघुन घेतो अशी धमकी देवुन शिवीगाळी केली.याबाबत कर्जत पोलीस ठाणे कर्जत पोलीस ठाणे येथे दोन गुन्हे दाखल असून भा.दं.वि.क. १४३, १४७, १४९, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/९०६ वडते हे करीत आहेत.

## चिंचवण गावातील रस्त्याच्या काँक्रीटीकरण कामाचे लोकार्पण

पांडुरंग घरत, गिरीष घरत, धाऊ भोपी इत्यादी मान्यवर उपस्तिथ होते. या रस्त्याच्या कामाची मागणी पूर्णकेल्या बद्दल चिंचवण ग्रामस्थांनी शेतकरी कामगार पक्षाच्या नेते मंडळी व गावातील पदाधिकारी यांचे आभार मानले.

## कर्जत – खोपोली मार्ग ठरतोय 'मौत का कुव्वा'!

वेळी दोन्हीकडून समोरासमोर वाहने आल्यावर एकमेकांना जाण्याकरीता तारेवरची कसरत करावी लागते. परिणामी दररोज छोटे–मोठे अपघात होत असतात. कधी कधी वाहने रस्त्यांवरून कोसळून पलटी तर काही पलटी होता–होता वाचत आहेत. काही महिन्यांपूर्वी रात्री झालेल्या अपघातात एकाला आपले प्राण गमावावे लागले होते. तर अपघातात अनेकांना झालेल्या दुखापतीमुळे आज ही रुग्णालयात उपचार घ्यावे लागत आहेत. या मार्गांवर दिशादर्शक फलक नसल्याने व रस्ता अर्धवट ठेवल्याने अपघाताच्या घटनांत वाढ झाली आहे.

हाळ फाट्यापासून या मार्गांवर अद्याप कुठेही दिशादर्शक फलक व सुरक्षा उपाय योजना करण्यात आलेल्या नसल्याचे प्रवासी व वाहन चालकांकडून बोलले जात आहे. अपघात घडल्यानंतर अपघातात जीवितहानी झाल्यावर या मार्गांवर सुरक्षा नियमांची अमंलबजावणी व दिशादर्शक फलक बसविणार का? असा प्रश्न उपस्थित करतानाच रस्त्यांचे राहिलेले काम व कामाचा दर्जाची तपासणी ठेकेदाराची मुद्दत संपल्यावर एमएसआरडीसीचे अधिकारी करणार का? एकीकडे प्रवाशांचा जीव धोक्यात आहे, तर दुसरीकडे संबंधित अधिकारी नक्की कार्यालयात झोपले की कोरोनाच्या भीतीने लॉकडाऊन झाले? असा संतप्त सवाल स्थानिक ग्रामस्थ व प्रवासी वाहन चालकांकडून विचारला जात आहे.

# पूर्व परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन केंद्राचा लाभ घ्यावा : विजय तळेकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोग आणि विशेषत राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत 'गरुड झेप स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात आले. प्रत्येक महिन्याच्या दर शनिवारी व रविवारी हे मार्गदर्शन केंद्र सुरू असणार आहे. या मार्गदर्शन केंद्रामध्ये शासकीय सेवेत उत्कृष्ट काम केलेल्या अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळणार आहे. जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या पेण येथील भाऊसाहेब नेने कॉलेज हॉल येथे हे केंद्र सुरु होणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २ जानेवारी २०२२ रोजी राज्यसेवा पूर्व परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही या मार्गदर्शन केंद्राचा लाभ मिळणार आहे. तसेच कोविड–१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील इतर तालुक्यातील विद्यार्थ्यांना पेण येथील या केंद्रावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांसाठी ते राहत असणाऱ्या तालुक्यातील तहसीलमध्ये दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून थेट प्रक्षेपणाद्वारे या मार्गदर्शनाचा लाभ घेण्याची सुविधा जिल्हा प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पनवेल तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी तहसीलदार विजय तळेकर यांच्या सूचनेनुसार सदर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन शनिवारी (दि.०४ डिसेंबर) सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे करण्यात आले. या शिबिरात जवळपास ४० प्रशिक्षणार्थींनी सहभाग नोंदवला. याशिवाय या स्पर्धा परीक्षा केंद्रासाठी जिल्ह्यातून अधिक प्रतिसाद मिळाल्यास जिल्ह्यात अन्य तालुक्यांमध्ये देखील अशा प्रकारचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येईल, असा मानस जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची आणि विशेषत राज्यसेवा पूर्व परीक्षेची तयारी करणाऱ्या पनवेल तालुक्यातील विद्यार्थ्यांनी या केंद्रातील सुविधांचा लाभ घेण्यासाठी तहसील कार्यालय पनेवल येथे अर्ज सादर करून या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेश घ्यावा असे आव–ाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या वतीने पनवेलचे तहसिलदार विजय तळेकर यांनी केले आहे.

# खारघरमध्ये घनकचरा व्यवस्थापन, वर्गीकरण कार्यशाळा संपन्न




**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर येथील रघुनाथ विहार याठिकाणी घनकचरा व्यवस्थापन, वर्गीकरण बाबत कार्यशाळा घेण्यात आली. निसर्ग हिच खरी संपत्ती आहे. निसर्गाचे जतन करणे, इतकाच एकमेव पर्याय माणसाकडे उपलब्ध आहे. दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्यांपैकी ३० टक्के कचरा स्वयंपाक घरातील आणि वाया गेलेल्या अन्नाचा असतो. त्यामुळे अन्न वाया न घालवण्याचे संस्कार प्रत्येक गृहिणीने आपल्या पाल्यांना दिले तर कचरा उत्पत्ती कमी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन निसर्गगुण या बायोगॅस् संयंत्राचे जनक आणि भाभा ऑटोमिक संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शरद काळे यांनी या कार्यशाळेत केले.

या कार्यशाळेत पनवेल महापालिका आयुक्त गणेश देशमुख, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, कल्याण–डोंबिवली महापालिका उपायुक्त रामदास कोकरे, सहायक आयुक्त डॉ. वैभव विधाते, बिर्ला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पाटील तसेच महापालिका अधिकारी– कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. काळे म्हणाले की, घनकचरा व्यवस्थापन आज काळाची गरज बनली आहे. मानवाच्या मुलभूत गरजांमध्ये घनकचरा व्यवस्थापन सुध्दा एक भाग बनली आहे. घरामध्ये दैंनदिन निर्माण होणारा कचरा घराबाहेर जाणार नाही, याची दक्षता प्रत्येक गृहिणीने घेतली पाहिजे, असेही यावेळी डॉ. शरद काळे यांनी सांगितले. स्वच्छ भारत अभियानांतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण–२०२२'ची प्रभावी अमंलबजावणी पनवेल महापालिका क्षेत्रात सुरु आहे. या अंतर्गत जनजागृतीपर घनकचरा व्यवस्थापन, वर्गीकरण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला, अशी माहिती यावेळी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी दिली.

# शिवसेनेतर्फे आयोजित आरोग्य शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना शहर शाखा खारघर यांच्या वतीने आयोजित मोफत रक्त तपासणी व नेत्र तपासणी शिबिराला परिसरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी सोबत पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, महानगर समन्वयक गुरुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत आदींसह शिवसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. खारघर येथील शहर प्रमुख प्रकाश गायकवाड, शाखा प्रमुख वैभव दळवी यांच्यावतीने आणि राजगोबिंद नर्सिंग होम यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या मोफत रक्त तपासणी व नेत्र तपासणी शिबिरास खारघरसह परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहून उस्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी आयोजक पदाधिकाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देवून असे नागरी हिताचे कार्यक्रम यापुढेही राबविण्याचे आवाहन जिल्ह्यातील शिवसैनिकांना केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## अवकाळी पावसात गुरांचा वाडा जमीनदोस्त



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील भानंग ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील एका शेतकऱ्याचा गुरांचा वाडा दि.१/१२/२०२१ रोजी संध्याकाळच्या सुमारास अवकाळी पावसाने जमीनदोस्त झाला.भर वस्तीत असणारा हा वाडा अचानक जमीनदोस्त झाल्याने ग्रामस्थांची धावपळ झाली या अवकाळी पावसामुळे कुठल्याही प्रकारची जीवीत हानी झाली नसली तरी वाडा संपुर्ण जमीनदोस्त झाल्याने शेतकरयाचे अतोनात नुकसान झाले असल्याची माहिती भानंग ग्रामपंचायतीचे सरपंच रघुनाथ वाघरे यांनी दिली.

भानंग गावातील शेतकरी मारुती हिरू आंबेकर यांच्या गुरांचा वाडा अवकाळी पावसामुळे संध्याकाळी अचानक जमीनदोस्त झाला. वाड्यातील जनावर जखमी झाले असून कुठल्याही प्रकारची जीवित हानी झालेली नाही त्यामुळे अनर्थ टळला आहे.अवकाळी पावसामुळे गुरांचा वाडा जमीनदोस्त झाल्यानंतर ताबडतोब तळा तहसिल कार्यालयास कळविण्यात आले तहसीलदार श्री.कनशेट्टी यांच्या सुचनेवरून तलाठी यांच्याकडुन पंचनामा करण्यासाठी तातडीने घटनास्थळी रवाना झाले व पंचनामा करण्यात आलेला आहे शेतकऱ्याचा वाडा पूर्णपणे कोसळला असून त्याचे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले असल्याचे समजते. शेतीची मशागत करण्याच्या सध्याच्या काळातच शेतकऱ्याचा वाडा आकस्मिक जमीनदोस्त झाल्याने मशागतीची कामं लांबणीवर पडण्याची चिंता शेतकऱ्याला भेडसावत होती त्याच बरोबर गुरांना कोठे बांधायचे यावेळी त्याच्या आक्रोशातून जाणवले.

## शिल्पा बारसिंग यांना आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त कटगुण (ता. खटाव) येथे रविवारी (दि. २८) झालेल्या कार्यक्रमात शिल्पा देवेंद्र बारसिंग यांना सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष उदय सदाशिव कबुले यांच्या हस्ते तालुका स्तरावरील आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

शिल्पा बारसिंग या सध्या ढोकळवाडी (ता. खटाव) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून त्यांनी कोरोना महामारीच्या काळात विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन विविध प्रकारे शालेय शिक्षण देण्याचे काम केले, तसेच त्यांनी महिला बचत गटाच्या माध्यमातून माहुली गावात अनेक उपक्रम राबविले आहेत. या कार्याची दखल घेत बारसिंग यांना सन्मानित करण्यात आले.

सांगली जिल्ह्यातील विटा येथील मनमंदिर बँकेचे व्यवस्थापक भूपेंद्र बाबूराव बारसिंग यांचे लहान बंधू व माहुली ग्रामपंचायतीचे सदस्य डॉ. देवेंद्र बारसिंग यांच्या शिल्पा या पत्नी असून मिळालेल्या या आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कळंब पाषाणे वांगणी रस्त्याची दुरावस्था खराब रस्त्यामुळे एसटी बंद ; विद्यार्थ्यांचे हाल

**दै.रायगड नगरी । कर्जत**


तालुक्यातील महत्वाचा समाजाला जाणारा कळंब-पाषाणे -वांगणी रस्त्याची दुरवस्था झाली आहे. यापूर्वीच्या ठेकेदाराने रस्त्याचे काम नित्कृष्ट दर्जाचे केले आहे आणि त्यामुळे अल्पवधीत रस्ता खराब झाला. दरम्यान, खराब रस्त्यामुळे एसटी गाड्या कर्जत आगाराने गाड्या बंद झाल्या आहेत. परिणामी विद्यार्थी आणि नोकरदार यांचे प्रचन्ड हाल होत असून आधी रस्त्याची डागडुगी करावी अशी मागणी साळोख गावाचे रहिवाशी आणि राष्ट्रवादी काँग्रेस चे पदाधिकारी अनिस बुबेरे यांनी केली आहे. मागणी मेनी न झाल्यास प्रथम रस्ता रोको आणि नंतर उपोषण करण्याचा इशारा या पंचक्रोशीतील साळोख, कळंब, पाषाणे ग्रामपंचायत मधील रहिवाशी यांनी दिला आहे.

तालुक्यातील प्रमुख जिल्हामार्ग आणि जिल्हा परिषदेच्याया मालकीचे रस्ते यांचा विचार केला तर त्यांची अवस्था खड्ड्याबाबत अजिबात चांगली नाही.त्यातील जास्त रहदारी असलेल्या कळंब-पाषाणे-वांगणी रस्त्यावरील एका मोठ्या पुलावरून वाहतूक शासनाने अवजड वाहनांसाठी बंद केली आहे. तर मागील वर्षात तब्बक ४ कोटी खर्च करून देखील या रस्त्याची अवस्था निधी वाहून गेला असे म्हणण्याची वेळ आली आहे. या रस्त्याचे काम चांगले व्हावे म्हणून जिल्हा परिषदेचे दिवंगत सदस्य सुदाम पेमारे यांनी स्थानिकांच्या मदतीने एक फोरम उभा केला होता.मात्र त्याला देखील या रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराने जुमानले नाही. त्याचवेळी रस्ता खराब असल्याने या रस्त्याने वाहतूक होणारी एसटी गाडी देखील परिवहन मंडळाला बंद करावी लागली आहे.तर याच भागात असलेल्या बोरगाव कडे जाणारा रस्ता देखील मोठमोठ्या खड्डयांनी व्यापला आहे.

कर्जत तालुक्यातील कळंब भागातील रहिवाशी यांना वांगणी रेल्वे स्थानकात पोहचण्यासाठी जवळ चा असलेला रस्ता मंदावला आहे..त्या पाईप मोऱ्या ३० वर्षापूर्वी रस्त्याचे बांधकाम करण्यात आले,तेंव्हा बसविण्यात आले होते. मात्र मागील दहा वर्षात तब्बल दोनवेळा रस्त्याचे डांबरीकरण करताना कोणीही त्या पाईप मोरीकडे पाहायला बांधकाम विभागाला वेळ मिळाला नाही. पावसामुळे त्या मोरी ला भगदाड आणि खराब रस्ता यामुळे एसटी गाड्यांची वाहतूक बंद झाली आहे. त्यामुळे कळंब भागातील रहिवासी, विद्यार्थी, नोकरदार यांना वांगणी येथे उपनगरीय लोकल पकडण्यासाठी जाताना मोठी कसरत करावी लागत आहे.त्या सर्वांना नेरळ येथे येऊन लोकल पकडावी लागते. त्यासाठी लागणारा फेरा यामुळे प्रवास, वेळइंधन यांचा भार देखील वाढत असून त्यावर पडलेल्या भगदाड बद्दल माले गावातील ग्रामस्थ माजी सरपंच जयवंत वेहेले यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रायगड जिल्हा परिषद यांना कळविले आहे. पण बांधकाम विभाग या रस्त्याकडे लक्ष देताना दिसत नाही.



# कर्नाळा सर्कल परिसर होणार वाहतूक कोंडीपासून मुक्त



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील पनवेल शहर वाहतूक शाखेच्या हद्दीतील कर्नाळा सर्कल या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज चौक, टपाल नाका, गुरु नानक चौक, आयडीबीआय बँक, भाजपा पार्टी ऑफिस, रुपाली सिनेमा टॉकीज अशा विविध बाजूनी येणारे रोड एकत्र येतात याठिकाणी जवळच बाजारपेठ, भाजी मार्केट व बँका असल्याने अनेकदा वाहतूक कोंडी होत होती. या संदर्भात वाहतूक शाखेने विविध उपाय योजना करून तो परिसर वाहतूक कोंडी मुक्त करण्याचा संकल्प केला आहे.

कर्नाळा सर्कल हे शहराचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने व सदर परिसरात विविध आस्थापना असल्याने सदरचा परिसर हा नेहमीच गजबजलेला असतो कर्नाळा सर्कल हा परिसर अतिशय दाटीवाटीचा असल्याने व सदर परिसरात नागरिकांची नेहमीच जास्त वर्दळ असल्याने त्या परिसरात वाहतूकिची प्रचंड कोंडी होत असते. त्यामुळे आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास याठिकाणी तात्काळ मदत पाठविण्यासाठी अडचण निर्माण होऊ शकते या हेतूने वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या आदेशाने कर्नाळा परिसरातील वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने कर्नाळा सर्कलकडे येणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक , रुपाली सिनेमा या तिन्ही बाजूंच्या रस्त्यावर कर्नाळा सर्कलपासून २० मीटर अंतरापर्यंत कोणतेही वाहन रस्त्यावर पार्क करण्यास मनाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत त्यानुसार पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनानुसार वाहतूक पोलिसांनी या आदेशाची अंमलबजावणी करून कायदेशीर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे सर्कल सुद्धा लहान करण्यात येणार असल्याने वाहतूक कोंडी मुक्त परिसर लवकरच आपल्याला पाहण्यास मिळणार आहे.


मा.रावसाहेब कोर्ट

अर्जदारांचे वकील अॅड.एकनाथ जी. खुटले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६५०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) श्रीमती.कमल जनार्दन राणे, वय : ५७ वर्षे
२) सौ.वैशाली अजय पडवळ, वय : ३८ वर्षे
रा.भानवज, पो.खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड
३) श्री.किशोर जनार्दन राणे, वय : ३७ वर्षे
४) श्री.विलास जनार्दन राणे, वय : ३५ वर्षे
५) श्री.प्रवीण जनार्दन राणे, वय : ३२ वर्षे
क्र.१, ३ ते ५ रा.करंजाडे गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.जनार्दन तुकाराम राणे हे दि.२१/०९/२०२१ रोजी करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. त्यांचे खालील वर्णनाचे मिळकतींबाबत वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| केआरजेडी/एसआर १२-१८ | ६४ | १ ई | ०-३६-४ |
| | ७६ | १ पै | ०-३७-५ |
| | ११५ अ | - | ०-५६-९ |
| | १२८ | ३ | ०-२१-५ |
| करंजाडे १११ | ६३ | ८ | ०-०१-० |
| | ७२ | १ ई | ०-०१-० |

सदर मिळकती महाराष्ट्र शासनाने नव्या मुंबई प्रकल्पाकरिता संपादीत केल्या असून, संपादीत मिळकतींसंदर्भात जनार्दन तुकाराम राणे यांचे हिश्श्यास खालील वर्णनाचा भूखंड वाटप झालेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| स्थळ | सेक्टर क्र. | भूखंड क्रं. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| करंजाडे | ३ | ७३ | ५२४.९५ |

अर्जदार हे कै.जनार्दन तुकाराम राणे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/ क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.इंदलकर साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील अॅड.गुरुनाथ दत्ता भगत

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो.वर्ग १ यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज क्र.१२३४/२०२१
ने.ता.१७/०१/२०२२

श्री.करणज्योत सिंग जतिन्दरापाल सिंग धिडसा
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.चाळ नं.१०, रुम नं.११४, पंजाबी कॉलनी,
जी.टी.बी.नगर, सायन पूर्व, अॅन्टॉपहिल, मुंबई-४०००३७
मो.क्र.९७०२९३६७६० — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका, रोडपाली विभाग
जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
कार्यालय : कळंबोली गाव, काळभैरव मंगल
कार्यालयाजवळ, कळंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड, पिन-४१०२१८ — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांच्या वडिलांचा मयत जतिन्दरापाल सिंग चरणजित सिंग धिडसा यांचा मृत्यू दि.०१/१२/२०१९ रोजी रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. तशी मृत्यूची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.१२३४/२०२१ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्याी.

स्थळ : पनवेल
दि.०४/१२/२०२१

सही/ क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस सूचित करणेत येते की, कै. विठोबा दामा तांडेल (मयत) यांचे वारस १) श्री. मेघनाथ विठोबा तांडेल २) श्रीमती सुमन गजानन कडू ३) श्रीमती मालती मुकुंद कडू, हे खालील परिशिष्टामध्ये अ वर्णन केलेल्या जमिनीचे मालक आहेत. (यापुढे सदर जमिनीचा उल्लेख सदरहू मिळकत असा केला आहे.)

**परिशिष्ट अ**

**मौजे : पागोटे, ता. उरण, जि. रायगड**

| गावाचे नाव | यु.केस | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|---|
| पागोटे | ३१९ | १५ | ०४ | ०-२४-० | १०००+१००१ १००३+१००४ द्रोणागिरी |
| | | ४३ | ०७ | ०-०४-५ | |
| | | ५७ | ०६ | ०-१-८ | |

सदरहू जमिन महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता संपादित केलेली असुन सदर संपादित जमिनिबद्दल जमिनिधारकास १२ १/२ टक्के दराने भुखंड वितरीत केले आहेत येणेप्रमाणे

**परिशिष्ट ब**

**भूखंडाचे वर्णन**

| भूखंड क्र. | सेक्टर नं. | नोड | तालुका व जिल्हा | क्षेत्रफळ चौ.मी. | सिडको फाईल नं. |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | ५४ | द्रोणागिरी | उरण, रायगड | ४०० चौ.मी. | १०००+१००१ १००३+१००४ द्रोणागिरी |
| | | | एकूण विकसनाचे क्षेत्र | ४०० चौ.मी. | |

(या पुढे यास सदरहू भुखंड असे संबोधले जाईल)

सदरहू भुखंड आमचे आशिलांचे दिनांक ०३/१२/२०२१ रोजीच्या विकसिन करारानुसार त्यातील नमुद अटी व शर्तीनुसार विकसित करावयास घेतला आहे.

सदरहू भूखंड बाबत कोणतीही व्यक्ती/ संस्था/ कंपनी ह्यांचा विक्री, गहाणपत्र, भाडेकरार, अभिहस्तांकन, बक्षिसपत्र, न्यास, देणगी, लिअन, हव-ाला, ताबा सुविधाधिकार, वारसाहक्क, याद्वारे किंवा अन्यथा कशाही प्रकारे उक्त मालमत्तेत किंवा त्यावर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणताही हक्क, हितसंबंध दावा किंवा मागणी असणाऱ्या सर्व व्यक्ती/ संस्था/ कंपनी ह्यांना तो लेखी स्वरुपात संबंधित कागदपत्रासहित नोटराईज्ड प्रती खऱ्या नक्कल म्हणून खालील निमनस्वाक्षरीकाराकडे शॉप नं.२६, प्रभात सेंटर, सेक्टर-१ए, सीबीडी बेलापूर, ता.जि. ठाणे, नवी मुंबई-४००६१४. येथे आजच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून २१ दिवसांत आणून द्याव्यात. अन्यथा सदर मिळकतीवर संबधितांचा असलेल हक्क संबंधितानी. जाणुनबुजून सोडून दिला असल्याचे समजून, आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, यांची नोंद घ्यावी.

दिनांकः ०३/१२/२०२१

सही/-
सुनिता राम पाटील
९८६७६८८७८८
(SMS whatsaap only)
(M.Com, M.A., L.L.M., G.D.C. & A)
(वकील उच्च न्यायालय व नोटरी भारत सरकार)



राव साहेब

अर्जदारांचे वकील अॅड.एकनाथ जी. खुटले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७४०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२२

१) श्री.नामदेव जयराम म्हात्रे, वय : ६२ वर्षे
२) श्री.जनार्दन जयराम म्हात्रे, वय : ६० वर्षे
३) श्री.बाळू जयराम म्हात्रे, वय : ५८ वर्षे
४) श्री.रामनाथ जयराम म्हात्रे, वय : ५४ वर्षे
५) श्री.बबन जयराम म्हात्रे, वय : ४८ वर्षे
सर्व रा.हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.सोनी उर्फ सिताबाई जयराम म्हात्रे या दि.२३/०४/२००६ रोजी मौजे : हरिग्राम, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे खालील वर्णनाचे मिळकतींबाबत वारसदाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**शेतजमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| पनवेल-४९८ अे | १७६ | ३ प | ०-३२-९ |
| | १९१ | १ अ | ०-९१-१ |
| | १९१ | १ ब | ०-४०-७ |
| | १९१ | १ फ | ०-६३-० |
| | १९२ | १/१ | २-५०-७ |
| | २१० | ० | २-६०-३ |
| | २११ | ३ | १-५६-८ |
| | २१३ | १ प | ०-५३-७ |
| | २१३ | ३ | ०-९५-१ |
| | २१४ | २ | ०-३३-४ |
| | २१४ | ३ प | ०-०७-६ |
| | २१४ | ४ प | ०-४२-५ |
| | २१४ | ५ | ०-२१-२ |
| | २१४ | ६ प | ०-४१-० |
| | २१४ | ७ प | ०-५१-६ |
| | २२० | प | ०-४७-० |
| | ३८६ | २ अ | ०-२४-३ |

अर्जदार हे कै.सोनी उर्फ सिताबाई जयराम म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना.कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. आज दि.३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/ क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



अर्जदाराचे वकील : अॅड.विपुल रमाकांत ठाकूर

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.११०/२०२१
नि.नं.१५/ड
ने.ता.१५/०१/२०२२

१) श्रीमती.इंदू जगदीश भोईर
वय : ५९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.अमित जगदीश भोईर
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.अजित जगदीश भोईर
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
वरील रा.१ ते ३ पत्ता : घर नं.२३३७,
गणपती मंदिरा जवळ, बालई उरण,
ता.उरण, जि.रायगड-४००७०२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. जगदीश पांडुरंग भोईर यांचे निधन रा.मु.पो.काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.जगदीश पांडुरंग भोईर यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.जगदीश पांडुरंग भोईर यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : काळाधोंडा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नांव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : काळाधोंडा ४७ | ५ | ३ | ०-१-३ |
| २ | | ६ | २ | ०-२७-० |
| ३ | | ८ अ | २ | ०-२-८ |
| ४ | | ११ | ३ | ०-१०-० |
| ५ | | ११ | ५ | ०-१२-७ |
| ६ | | ७९ | ३ | ०-०१-८ |
| ७ | | ७९ | ६ | ०-१४-८ |
| ८ | | ८१ | ३ | ०-०३-५ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ३ हे कै.जगदीश पांडुरंग भोईर यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत देण्याची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०४/१२/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/ क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण



अर्जदाराचे वकील अॅड.मच्छिंद्रनाथ आ. घरत

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.२०६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०१/२०२२

१) श्री.मच्छिंद्रनाथ काशिनाथ घरत
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.प्लॉट नं.०५, बिल्डींग नं.२, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) श्री.नारायण काशिनाथ घरत
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड-४००७०२
३) श्रीमती.पुष्पा प्रवीण ठाकूर उर्फ काशिनाथ घरत
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.बेलपाडा, ता.उरण, जि.रायगड-४००७०२
४) श्रीमती.यामिनी मोहन पाटील
उर्फ यामिनी काशिनाथ घरत
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.करंजा, कोंढरीपाडा, ता.उरण, जि.रायगड-४००७०२ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. काशिनाथ विश्वनाथ घरत यांचे निधन रा.मु.पो.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड येथे झाले आहे. अर्जदार हे कै.काशिनाथ विश्वनाथ घरत यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.काशिनाथ विश्वनाथ घरत यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नांव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : भेंडखळ २७०/८३ | २७९ | ३ | ०-०३-४ |
| २ | | २४७ | २ | ०-०५-१२ |
| ३ | | २४७ | ४ | ०-०८-० |
| ४ | | २५१ | ३ | ०-०७-१२ |
| ५ | | २५२ | १२ A | ०-०६-४ |
| ६ | | २६३ | ३ | ०-१८-१२ |
| ७ | | २६८ | ५ | ०-०५-१२ |
| ८ | | २६८ | १० | ०-०३-४ |
| ९ | | २७१ | IA | ०-०४-८ |
| १० | | २७९ | ५ | ०-०६-० |
| ११ | | २८० | २ | ०-११-१२ |
| १२ | | २८५ | २ | ०-०६-८ |
| १३ | | २८६ | १० | ०-०४-४ |
| १४ | | २९२ | ८ | ०-०९-० |
| १५ | | २९५ | १० | ०-०४-४ |
| १६ | | २९८ | १ | ०-१३-४ |
| १७ | | ३०८ | ३ | ०-०९-० |
| १ | मौजे : भेंडखळ ८५/८६/८८ | २४० | ११ | ०-२-० |
| १ | मौजे : भेंडखळ १६५ | १७४ | ८ | ०-२-१२ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ ते ४ हे कै.काशिनाथ विश्वनाथ घरत यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत देण्याची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२५/११/२०२१ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण

## संक्षिप्त...

# माणगाव येथील कचेरी रोड खड्ड्यात

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवचा अत्यंत वर्दळीचा मार्ग आणि महत्वाचा रस्ता सर्व माणगांवकर बाजारहाट, शासकियकामे, शाळा-कॉलेज देवदर्शनाला मंदिराकडे, वाचनालयाकडे जाताना, राज्यपरिवहन बस, रेल्वे स्थानकां कडे प्रवासाला निघताना तसेच धंदा व्यवसाया निमीत्त पायीचालत, दुचाकी, चारचाकी मोठ्या वाहनांतून बाजारात दिवसा रात्री नेहमीच येता जाता नाईलाजास्तव हाच रस्ता वापरतात. याच रस्त्यावर वाहतुक कोंडीने नेहमीच श्वास कोंडतो. अशा रस्त्यावर तलाठी भवन शेजारील नगर पंचायत गार्डनच्या कडेला सैनिक विश्राम गृहाकडे वळताना कोपऱ्यावर अगदीच प्रांताधिकारी निवास स्थानाच्या लगत, गतिरोधकाच्या जवळच दहा पंधरा फूटावरच रस्त्यात आडवा धोकादायक मोठा खड्डा पडला; नव्हे पाडला आहे. अस लोक बोलतात.

येथुन जाताना माणगांवकरांच्या मणक्याला झटका बसून आपोआप त्यांच्या मुखातून, रस्त्याची ही अवस्था करणाऱ्यांच्या नावाने लाखोली फूलं वाहिली जात आहे. नागरी पायाभुत सुविधांसाठी झटणारे, जनतेला आश्वासनं देणारे तसेच शासनाचे मोठे अधिकारी, पोलीस अधिकारी, पुढारी अर्थात जनतेचे सेवक याच रस्त्यावरुन येतात जातात. विशेष म्हणजे याबद्दल पोलीस व नगर-पंचायत प्रशासनाच्या कुणालाच काहीच कसं वाटत नाही! याचे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या ठिकाणी मोठ्या अपघात प्रतिक्षेत किरकोळ अपघात, ही रोजची बाब झाली आहे. असे अनुभव सांगताना अनेकांनी आमचेशी संपर्क करुन या रस्त्याबद्दल संतप्त, उद्वीग्न भावना व्यक्त करीत, संबंधितांना याचे तात्काळ दुरुस्ती डागडुजी बाबत तिव्र प्रतिक्रिया देताना म्हणतात हे उपद्रवी काम, ज्याने कोणी केले आहे, त्यांना नगरपंचायतीकडुन कारवाई करण्यासाठी आवाज उठवा! या बाबत माहीती घेतली असता, हा खड्डा नगरपंचायतच्या मोठ्या मुख्य जल वाहिनीवर मोठ्या कॉम्प्लेक्स् करीताच पाईप लाईनचे कामासाठी खोदण्यात आल्याचे समजते. याकडे कोणी लक्ष देईल का ? हे काम करणार संबंधित ठेकेदाराने सार्वजनिक रस्त्यात वर्दळीच्या ठिकाणी खोद-लेला हा खड्डा कामाच्या पूर्तते नंतर का बुजवला नाही ? नगर-पंचायत निवडणुक तोंडावर असल्याने आता हा खड्डा विव्हळंत आहे. आता तो प्रचाराचा मुद्दा ठरल्यास नवल वाटायला नको, आणखी किती मणके तोडणार? असा सवाल ऐरणीवर आला आहे.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# दिघी जेट्टीवर सोयी-सुविधांचा अभाव ; मेरिटाईम बोर्ड लक्ष देईल का?

## श्रीवर्धनहुन मुरुड जाणारा जलमार्ग बनला गैरसोयीचा

**दै.रायगड नगरी । दिघी**

दिघी - रायगड जिल्ह्यातील प्रसिध्द पर्यटन स्थळ म्हणून श्रीवर्धन व मुरुड या दोन तालुक्याला सागरी मार्गाने जोडण्यात आले आहे. मात्र, या मार्गावर जलवाहतुकीचा प्रवास करताना महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून प्रवाशांना सोयी-सुविधांचा अभाव जाणवत आहे. सुविधा मिळत नसल्याचा फटका येथील पर्यटनाला बसत आहे.



श्रीवर्धन येथून मुरुडकडे जाण्यासाठी जलप्रवास सुखकर असल्याने दररोज मोठ्या संख्येने प्रवासी बोटीने ये-जा करतात. दिघी ते पलीकडे दांडा जल प्रवासास अवघे १५ मिनिटे लागतात. शिवाय जलवाहतुकीचे दरही आवाक्यात असल्याने दररोज अनेक प्रवासी जलप्रवासाला प्राधान्य देतात. मात्र, प्रवाशांच्या तुलनेत महाराष्ट्र मेरीटाइम बोर्ड प्रवाशांच्या सुविधांकडे दुर्लक्ष करीत असल्याची प्रवाशांची तक्रार आहे. दिवेआगर, श्रीवर्धन, हरिहरेश्वर तर मुरुड, जंजीरा किल्ला, काशीद ही ठिकाणे दोन्ही तालुक्यातील पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहेत. दिवाळी हंगाम नुकताच ओसरत आहे. त्यातून ही लाखो पर्यटकांनी येथे भेट दिली आहे. त्याचप्रमाणे अलिबाग या जिल्ह्याच्या ठिकाणी शासकीय कामासाठी व वैद्यकीय कामासाठी जाण्यासाठी या मार्गावरून जनतेची वर्दळ सुरूच असते.

मुरुड व श्रीवर्धन या दोन्ही तालुक्यांच्या मध्ये राजपुरी खाडी असल्याने या खाडीमध्ये दिघी व अगरदांडा येथील जलवाहतुकीसाठी महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाकडून मागील ५ वर्षे पूर्वी प्रवासी जेट्टी उभारण्यात आल्या आहेत. याठिकाणी बांधलेल्या प्रशस्त इमारती म्हणजे नुसत्या देखावा बनल्या आहेत. रात्रीच्या वेळी सर्वत्र अंधार असून शौचालयाची व्यवस्था नसल्याने अनेक प्रवाशांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. आगरदांडा येथे असलेली प्रशस्त इमारत बंद अवस्थेत आहे. तर दिघी येथे असलेल्या इमारतीचा फायदा कोणत्याही प्रकारे येथुन प्रवास करणाऱ्या पर्यटक किंवा नागरिकांना होताना दिसत नाही. तर दोन्ही ठिकाणी स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्याने विशेषतः महिलांची यामध्ये गैरसोय होत आहे. आगरदांडा जेट्टीवर बाथरूम व शौचालय बनले आहेत परंतु ते बंद असून त्याचा कोणताही लाभ प्रवाशांना होत नाही. त्याचप्रमाणे दिघी जेट्टी मार्गात खड्डे असून पथदिवे बंद अवस्थेत असल्याने रात्रीच्या वेळी याठिकाणी काळोख पसरलेला असतो. मेरिटाईम बोर्डाने दोन्ही जेट्टीच्या बाबतीत असणाऱ्या गैरसोई दूर करण्याची मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

दिघी येथील जेट्टीवर विजेचे खांब बसवण्यात आले. मात्र, दिवे बंद आहेत. त्यामुळे जेट्टीवर अंधार असून उशीरा प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अंधारातून चाचपत यावे लागते. तर आजूबाजूला समुद्राच्या अजस्र लाटा व रस्त्यावरील अंधार पाहून वाहन चालकांना व पादचाऱ्यांना अचानक समुद्रात पडण्याची भीती कायम असते. आगरदांडा जेट्टीवर प्रवाशांसाठी असणारे शौचालय मोडकळीस आले असून बंद आहे. स्वच्छतागृहांअभावी प्रवाशांना गैरसोयीला सामोरे जावे लागते. असे विदारक वास्तव असून लोकांची विशेषत: महिलांची कुचंबणा होते.

या मार्गाने मोठ्या प्रमाणात प्रवाशांची ये - जा सुरू असते. मात्र, दिघी येथून जेट्टीमार्गावर पूर्ण रस्त्याला खड्डे असून, अंधारासोबतच या खड्डेमय रस्त्यानी प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. दिघी येथे शौचालयात पाणी नसल्याने तिथे दुर्गंधी व अस्वच्छता दिसते. प्रवाशी जनतेला विनाकारण दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. या मार्गाने मोठ्या प्रमाणात प्रवाशांची ये - जा सुरू असते.

# कंटनेर ट्रेलरची धडक; मोटारसायकल चालकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली येथून मोटारसायकलवरुन करंजाडे येथे जाणाऱ्या व्यक्तीला भरधाव कंटनेरने धडक दिल्याने झालेल्या अप-घातात मोटारसायकलवरील व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना कळंबोली-जेएनपीटी मार्गावर घडली. या अपघातानंतर कंटनेर चालकाने कंटेनर त्याच ठिकाणी सोडून पलायन केले असून कामोठे पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.

सदर अपघातात मृत झालेल्या व्यक्तीचे नाव आदम मकानदार (४६) असे असून ते पनवेल मधील करंजाडे सेक्टर-२ मध्ये वुटुंबासह राहण्यास होते. मकानदार कामानिमित्त आपल्या मोटारसायकलवरुन कळंबोली येथे गेले होते. त्यानंतर दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ते कळंबोली येथून करंजाडे येथे परतत होते. यावेळी त्यांची मोटारसायकल कळंबोलीजेएनपीटी मार्गावर खांदागाव स्मशानभूमीजवळ आली असताना पाठीमागून आलेल्या भरधाव कंटेनरने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली.

या अपघातात आदम मकानदार गंभीर जखमी होऊन रस्त्यावर पडल्यानंतर त्यांना धडक देणाऱ्या कंटेनर चालकाने आपल्या ताब्यातील कंटेनर त्याच ठिकाणी सोडून पलायन केले. यावेळी इतर प्रवाशांनी जखमी आदम मकानदार यांना रुग्णालयात दाखल केले असता, तेथील डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सदर घटनेनंतर कामोठे पोलिसांनी कंटनेर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# वाहनधारकांना मरण्याचा 'शौक'

## सूचना फलकाकडे दुर्लक्ष करून सर्रासपणे 'नो एन्ट्री'तून प्रवास

**दै.रायगड नगरी । खोपोली**

पोलीस चौकात नसल्याचा फायदा घेत व चौकात लागलेल्या फलकाकडे दुर्लक्ष करून सर्रासपणे 'नो एन्ट्री'तून प्रवास करण्याचा सपाटा अद्यापही शिळफाटा येथे सुरू असल्याचे दिसून येत आहे. पोलिस प्रशासनाने आपली जबाबदारी पार पाडली असली तरी 'नो एंट्री'तून प्रवास करीत बेशिस्त वाहनधारक अपघाताला आमंत्रण देत असल्याचे दिसून येत आहे.



अपघातांना आळा घालण्यासाठी पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पाताळगंगा नदीवरील छोटा पूल अर्थात 'नो एन्ट्री'तून प्रवास करणाऱ्या वाहनांवर पोलिसांकडून कारवाई मोहिम राबविण्यात आली होती. याच दरम्यान, सूचना फलक लावण्याची मागणी करण्यात आली होती.

त्यानुसार छत्रपती शिवाजी महाराज चौक व लौजीकडून महामार्ग छेदणाऱ्या ठिकाणी उजवीकडे वळू नका, असे दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. मात्र तरीही लौजी, चिंचवली, हाळ, खालापूर, पनवेल व मुंबईकडे जाणारे वाहनचालक इंदिरा गांधी चौकापर्यंत न जाता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून उजवीकडे वळून 'नो एंट्री'तून बेधडकपणे वाहन दामटत असल्याचे दिसून येत आहे.

# अवकाळी पावसाने थांबविला कबड्डीचा दम

**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोनाचे प्रादुर्भावामुळे बंद असलेले रायगड जिल्ह्यातील कबड्डी सामने सुरु होणार होते कबड्डीचा दम पुन्हा घुमणार होता. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन कडुन जिल्हा अंजिक्यपद निवड चाचणी स्पर्धा ३ डिसेंबर पासुन सुरु होणार होती. परंतु अवकाळी पडलेला पाऊसामुळे रद्द झाल्याने हा कबड्डीचा दम थांबला व कबड्डी रसिक व खेळांडुचे आनंदावर विरजन पडले.

रायगड जिल्ह्यात कबड्डी खेळांला विशेष महत्व आहे. जिल्ह्यात ३२० पुरुष संघ तर महिलांचे संघ ३२ संघ आहेत. जिल्ह्यात आंतर राष्टीय, राष्ट्रीय, राज्य स्तरीय, जिल्हा स्तरीय कबड्डी स्पर्धा होत असतात. या स्पर्धाना प्रेक्षकांचा उंदड प्रतिसाद लाभतो तर स्पर्धांना पुरस्कर्तेही लाभतात. रायगडात कबड्डीचा प्रचार आणी प्रसार तसेच जिल्ह्यातुन दर्जेदार खेळांडु व दर्जेदार कबड्डी पंच तयार व्हावेत या साठी महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह तथा रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह आस्वाद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी मेहनत घेत आहेत. रायगड जिल्ह्यात कबड्डीचा प्रसार व्हावा कबड्डी खेळांडुना व पंचाना योग्य मार्गदर्शन व्हावे या साठी रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनने विविध कमिटी स्थापन केल्या आहेत.

प्रदिर्घ कालावधी नंतर रायगडातील कबड्डी स्पर्धाना सुरवात होणार असल्याने खेळांडुनी मेहनत घेवुन क्रिडांगणे तयार करुन सराव करत होते परंतु अवकाळी पडलेल्या पावसामुले क्रीडंगणामध्ये चिखल झाल्याने पुन्हा नव्याने क्रिडांगण बनवावे लागणार आहे. कोरोनाचे प्रादुर्भावामुळे बंद आसलेले कबड्डी सामने सुरु होणार असल्याने कबड्डी रसिकांची उत्कंठा तर शिगेला पोहचलीच होती तर खेळांडुनी देखील कसुन सराव सुरु केला होता. परंतु अवकाळी पडलेला पाऊस व पावसाचे असलेले सावट पाहाता कबड्डी स्पर्धा कधी सुरु होणार यांची प्रेक्षक वाट पाहात आहेत तर कबड्डी खेळांडु देखील स्पर्धा खेळण्यासाठी सज्ज आहेत. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन कबड्डी पंचाचे मार्गदर्शन शिबिर आयोजित केले होते. पंच देखील या स्पर्धेसाठी सज्ज होते. बऱ्याच कलावधी नंतर पंचाच्या शिटीचा आवाज क्रिडांगणावर घुमणार होता. परंतु अवचाळी पावसामुळे हा आवाज काही काळ थांबणार आहे.

# कापडे बुद्रुक येथील अपघातातील बालक कोमात; उपचाराच्या खर्चासाठी दानशूरांना मदतीचे आवाहन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

सोमवार, दि. २९ नोव्हेंबर २०२१ रोजी सायंकाळी पावणेआठ वाजण्याच्या सुमारास पोलादपूर महाबळेश्वर रस्त्यावर सायंकाळी भरधाव मोटारसायकल चालविणाऱ्या तरूणाच्या बेपर्वाईमुळे एका बालकास धडक बसून तो गंभीर जखमी झाला. विनापरवाना विना इंश्युरन्स वाहन चालविणाऱ्या या तरूणाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, जखमी बालक आर्यन सुनील कंक याच्या मेंदूला मार बसल्याने तो कोमात गेल्याने पालकांवर आर्यनवरील उपचारासाठी आर्थिक आवाहन करण्याची वेळ आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथील कंक कार वॉशिंग ॲण्ड सर्व्हिस सेंटरच्या समोर कृष्णा दादा गोळे वय २६ रा.मुगांव, चिखली, ता. वाई, जि.सातारा या तरूणाने सायंकाळी पावणेआठ वाजण्याच्या सुमारास भरधाव वेगाने एमएच ११ सीबी ९२५१ ही भरधाव वेगाने रस्त्याच्या परिस्थितीकडे दूर्लक्ष करून चालविली. यावेळी आर्यन सुनील कंक, रा.रानवडी, ता. पोलादपूर हा १२ वर्षाचा बालक रस्ता ओलांडत असताना त्यास मोटारसायकलीने धडक देऊन गंभीर स्वरूपाची इजा करण्यास कारणीभूत ठरला आहे.

अपघात करणाऱ्या वाहनाचा विमा नसल्याने तसेच वाहनचालकाकडे वाहनचालक परवाना नसल्याने जखमी आर्यनवरील उपचारासाठी कोणतीही मदत होऊ शकली नाही. त्यामुळे ठाणे येथील क्रिटीकेअर सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यापासून आर्यनच्या उपचारासाठी गेल्या पाच दिवसांत तब्बल दोन लाखांचा खर्च त्याचे वडील सुनील शिवराम कंक यांनी सोसला आहे. आर्यनच्या उपचारासाठी तसेच ब्रेन सर्जरीसाठी अंदाजे सात लाख रूपयांचा खर्च होण्याची शक्यता असताना त्याचे वडील व कुटूंबियांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली आहे. यामुळे त्यांच्यावर मुलाच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन करण्याची वेळ ओढावली आहे.

जखमी आर्यनच्या उपचारासाठी दानशूर व्यक्तींनी आर्थिक मदत देण्यासाठी गुगल पे क्रमांक ९३२१९८९७०२ आणि स्टेट बँक ऑफ इंडिया वाकण ता.पोलादपूर या शाखेच्या सुनील शिवराम कंक बॅक अकाऊंट नंबर ३९८६७८१५०८९ आणि आयएफआयसी कोड एसबीआयएन ०००७७९४ असा आहे. जखमी आर्यनवरील उपचारासाठी अधिकाधिक आर्थिक मदत करून सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी त्याचे वडील सुनील कंक यांनी केले आहे.